स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड,मानव्यविद्याशाखे अंतर्गत इतिहास विषयातील पीएच.डी.पदवी साठी सादर करावयाचा संशोधन आराखडा

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

सम्राट अशोकाच्या शिलालेखातील बौद्ध धम्म प्रसार: ऐतिहासिक अभ्यास

संशोधक विध्यार्थिनी

सरस्वती निवृत्ती सोनाळे

एम.ए(इतिहास, (सेट)राज्यशास्त्र)

एम.एड.एम.फिल.(शिक्षणशात्र)

मो.8208051442

संशोधन मार्गदर्शक

प्रा डॉ आर आर पिंपळपल्ले

इतिहास विभाग प्रमुख व सहाय्यक प्राध्यापक

आदर्श शिक्षण संस्थेचे,

कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय हिंगोली

मो.9970414332

Gmail-drpraju.2006@gmail.com

संशोधन केंद्र

नूतन महाविद्यालय सेलू

जि.परभणी

जुलै 2021

प्रस्तावना

आधुनिक कालखंडामध्ये मानवाने लेखन कार्यासाठी सर्वसाधारण व जास्तीत जास्त कागदाचा उपयोग केलेला आहे. परंतु प्राचीन कालखंडात लेखन करण्याकरिता तत्कालीन सत्ताधीश प्रामुख्याने शिळा, लाकूड, कापड, किंवा जनावरांच्या कातड्याचा तसेच धातू (ताम्रपत्र भोजपत्र, ताडपत्र, ,खापरे)याचा वापर लेखनासाठी करत होते. त्यापैकी सर्वात टिकाऊ म्हणजे शिळा होय.या शिळेवर कोरलेल्या लेखनात शिलालेख असे संबोधले जाते. भारतात प्राचीन इतिहासाचे संशोधन करण्यासाठी पुराभिलेख विद्या चा फार मोठा उपयोग होतो, कारण प्राचीनतम वस्तू व इतर ठिकाणी आढळणारे लेख हे भारताच्या इतिहासाचे लेखन करण्यासाठी व अभ्यासासाठी महत्त्वपूर्ण साधणे आहेत. आज उपलब्ध असलेल्या सम्राट अशोकाच्या शिलालेखावर जे वर्णन वर्णीत आहे ते प्रमुख्याने अभ्यासले तर प्रत्येक व बहुतांश शिलालेखात प्रजेच्या हिताच्या कल्याणाच्या दृष्टीने काही मार्गदर्शक सूचना त्या शिळेवर सम्राट अशोकाने केरलेल्या आहेत. यामागील सम्राट अशोकाचा हेतू म्हणजे जास्तीत जास्त लोकांपर्यंत आपण दिलेल्या धर्माज्ञा.राजाज्ञा किंवा आदेश पुन्हा पुन्हा न सांगता एकच वेळेस गावाच्या दर्शनी भागावर रेखीव ठेवण्याचे प्रकार त्यांनी सुरू केलेला आढळतो. प्राचीन कालखंडाच्या अभ्यासात विशेषता: मोर्य घराण्याचा व सम्राट अशोका चा अभ्यास करावयाचा असेल आणि त्यात सम्राट अशोकाने बौद्ध धर्माचा स्वीकार केल्यानंतर ज्या शिलालेखांचा लेखन किवा निर्मिती केलेली आहे.त्यामध्ये सम्राट अशोकानी धर्मप्रसार, सामाजिक परिस्थिती, जनतेला ज्ञात करून देण्यासाठी फार मोठे योगदान दिलेले आहे.

सम्राट अशोकाच्या काळातील प्रशासन, सामाजिक,धार्मिक, आर्थिक परिस्थिती ज्ञात करून घेण्यासाठी त्यांचे शिलालेख अत्यंत महत्त्वपूर्ण व विश्वसनीय साधन आहेत. सम्राट अशोकाचे शिलालेख हे या काळाचे एकमेव दस्तऐवज आहेत त्याचबरोबर त्यांची विश्वासार्हता ही निर्वादित आहे. सम्राट अशोकाच्या शिलालेखांच्या बाबतीत प्रजेच्या हिताचे अनेक आदेश लेखन केलेले आहेत. सम्राट अशोकाच्या उज्वल कारकिर्दीचा व त्यांनी केलेल्या बौद्ध धम्म प्रसाराचा या शिलालेखात फार मोठा अभ्यास होऊ शकतो. सम्राट अशोकाचे शिलालेख जेव्हा ज्या परिस्थितीत उत्किर्ण केले गेले त्या स्थितीत ते आज देखील उपलब्ध आहेत. सम्राट अशोकाचे शिलालेखातील काही बौद्ध संघ प्रति समर्पित अभिलेख आणि दुसरे म्हणजे राजा म्हणून त्याने प्रजेसाठी केलेले किंवा संबोधलेले आहेत.सम्राट अशोकाच्या या शिलालेखात जनतेच्या कल्याणासाठी अधिकारी, कर्मचारी यांची नियुक्ती त्यांचे कार्य व कर्तुत्व याविषयीचे ही वर्णन आहे.

प्रस्तुत संशोधन शोध आराखडा व संशोधन विषय निवडताना सम्राट अशोकाच्या शिलालेखातील व त्यांनी निर्माण केलेल्या शिलालेखातील बौद्ध धम्म प्रसार कशा पद्धतीने झाला या विषयीचे विवेचन प्रस्तुत प्रबंधामध्ये केला जाणार आहे. हे विश्लेषण करत असताना तटस्थ व वस्तुनिष्ठ राहाण्याचा तसेच मांडणी करण्याचा प्रयत्न केला जाईल, सम्राट अशोकाचे शिलालेख कोणत्या प्रदेशात आहेत, त्यांचे भौगोलिक स्थान,त्यांचे महत्त्व, त्या शिलालेखातून दिलेली त्यांनी धम्माचे संदर्भातले आदेश किंवा संहिता धर्मप्रसार याविषयीचा अभ्यास केला जाणार आहे.

विषय निवडीचा हेतू

प्रस्तुत विषयाची निवड करत असताना :-

1)सम्राट अशोकाच्या संपूर्ण भारतभर पसरलेल्या शिलालेखांचा संपूर्णपणे अभ्यास करणे

2) सम्राट अशोकाच्या सर्व शिलालेख पैकी ज्या शिलालेखातून बौद्ध धर्म प्रसार व बौद्ध धर्म विचारसरणी यांचा प्रसार करण्यात आलेला आहे त्यांचा विस्तृतपणे अभ्यास करणे

3) सम्राट अशोकाच्या दीर्घ शिलालेख, लघु शिलालेख ,स्तभाभिलेख ,गुहाभिलेख इ विस्तृत अभ्यास करून बौद्ध धर्म प्रसार कसा झाला हे अध्ययन करणे.

प्रस्तुत शोध प्रबंधाचा मुख्य हेतू आहेत.

विषय निवडीचा उद्देश –

प्रस्तुत शोधप्रबंधा करिता विषय निवडताना सम्राट अशोकाच्या काळातील बौध्द धम्म प्रसार व प्रचार कसा झाला व तो प्राचीन काळातील एक समाज परिवर्तनाची कारकीर्द आहे हे सिद्ध करणे तसेच सम्राट अशोकाने मोर्य घराणे चा राजकीय विस्तार पेक्षा धम्म प्रसार हीच मानवी सेवा मानली हे अभ्यासणे. आधुनिक समाजला व राज्यकर्ता वर्गास सम्राट अशोका चे हे योगदान मार्गदर्शक व प्रेरणादायी ठरणारे असेल याचा अभ्यास करणे

संशोधन पद्धती

प्रस्तुत विषयाच्या संशोधनाकरिता प्राथमिक दुय्यम व इतर सहकारी साधनांचा वापर करून प्रस्तुत शोधप्रबंध मांडला जाणार आहे, या प्रस्तुत शोधप्रबंधा करिता ऐतिहासिक संशोधन पद्धती तील वर्णनात्मक व विश्लेषणात्मक संशोधन पद्धती चा वापर केला जाणार असून प्रस्तुत प्रबंधिका लेखन केली जाणार आहे.

ग्रहीतके-

1)सम्राट अशोक यांच्या काळातील शिलालेखात द्वारे झालेल्या बौद्ध धम्म प्रसार कसा झाला आहे का याचा अभ्यास करून विशेषण करणे

2) सम्राट अशोकाच्या द्वारे लिखित उत्तकिर्णत शिलालेखातून बौद्ध धर्म प्रसार व प्रचार व त्यांनी केलेल्या भारत व भारताबाहेरील जनतेला दिलेल्या राजाज्ञा आहेत त्याची पडताळणी करणे

3)सम्राट अशोकाचा धम्म हा समाज हित प्रजादक्ष होता का याचा विस्तृत पणे आढावा घेऊन विवेचन करणे

4)सम्राट अशोकाच्या धर्माचा व त्यांच्या राजाज्ञा यांचा अभ्यास करून सम्राट अशोकाचे महत्व व धर्माचे महत्त्व प्रकट करून त्याचे महत्व विस्तृत करणे

5) सम्राट अशोकाच्या शिलालेखात दीर्घशिलालेख, लघुशिलालेख, स्तंभाभिलेख, गुहालेख असे प्रकार पडत असून त्याद्वारे सम्राट अशोकाने संघ प्रति समर्पित अभिलेखांचे अध्ययन करून व ही सर्व बौध्द धम्माप्रती अत्यंत महत्वपूर्ण आहेत का? हे सिद्ध करणे

विषयाची व्याप्ती व मर्यादा

प्रस्तुत विषयाची व्याप्ती ही उतर भारत असून त्यामध्ये प्रामुख्याने उत्तर प्रदेश, बिहार, आसाम, ओरिसा इतर पूर्व भारतीय प्रदेश हे अभ्यास केंद्र आहे.सम्राट अशोकानी जे शिलालेख व त्या द्वारे ज्या राजअज्ञा यांचे शिलालेखात लेखन केले आहे त्या पैकी बौद्ध धम्म प्रसारासाठी चा उल्लेख व आज्ञा आहेत त्यांचाच अभ्यास या संशोधन प्रबंधात केला जाणार आहे

प्रकरण

1) प्रस्तावना/विषय प्रवेश

प्रस्तुत प्रकरणामध्ये सम्राट अशोकाच्याप्रारंभिक जीवनाचा आढावा, मोर्य घराण्याच्या संक्षिप्त इतिहासाचा आढावा घेतला जाणार आहे. तसेच प्रस्तुत विषयाच्या निवडीचा हेतू, विषयाच्या निवडीचा उद्देश, विषयाची संशोधन पद्धती, ग्रहीतके ,पूर्व साहित्याचा आढावा तसेच प्रकरणची सारश रूपाने मांडणी केली जाणार आहे.

2) बौद्ध धर्माचा ऐतिहासिक आढावा

प्रस्तुत प्रकरणा मध्ये सिद्धर्थ गोतम बुद्ध यांनी उपदेशीत केलेल्या धम्मचा अढावा घेऊन भारतातील बौद्ध धम्म विस्तार कसा झाला व सम्राट अशोक पूर्व तो धम्म कसा होता याचे विवेचन केले जाणार आहे तसेच कलिंग युद्धा नंतर तो धम्म भारत व भारता बाहेर कसा प्रसारित झाला याचा आढावा घेतला जाणार आहे

3 सम्राट अशोकाच्या शिलालेखाची भाषा व लिपी

प्रस्तुत प्रकरणा मध्ये सम्राट अशोकाच्या सर्वच 40 शिलालेखाची भाषा कोणती आहे. तत्कालीन असलेली प्राकृत भाषा व त्या सर्व शिलालेखाची लिपी (धम्म लिपी) कोणती आहे. शिलालेखाची भाषा व लिपी चे अर्थ व विस्तृतकरण याचे विवेचन या प्रकरणात केले जाणार आहे.

4) सम्राट अशोकाच्या दीर्घ शिलालेखातील बौद्ध धम्म प्रसार

प्रस्तुत प्रकरणा मध्ये सम्राट अशोकाच्या सर्वच 40 शिलालेख आहेत त्या पैकी 14 दीर्घ शिलालेखातील लिखाना द्वारे बौद्ध धम्म प्रसार कसा झाला त्या मधील जन आदेश काय आहेत किवा त्यांचे भोगोलिक स्थान कोणते आहेत चे विस्तृत पणे वर्णन या प्रकरणात केले जाणार आहे

5) सम्राट अशोकाच्या लघु शिलालेखातील बौद्ध धम्म प्रसार

प्रस्तुत प्रकरणा मध्ये सम्राट अशोकाच्या सर्वच 40 शिलालेख आहेत त्या पैकी लघु शिलालेखातील लिखाना द्वारे बौद्ध धम्म प्रसार कसा झाला त्या मधील जन आदेश काय आहेत किवा त्यांचे भोगोलिक स्थान कोणते आहेत चे विस्तृत पणे वर्णन या प्रकरणात केले जाणार आहे

6) सम्राट अशोकाच्या स्तंभाभिलेखातील धम्म प्रसार

प्रस्तुत प्रकरणा मध्ये सम्राट अशोकाच्या सर्वच 40 शिलालेख आहेत त्या पैकी स्तंभाभिलेखातील लिखानाद्वारे बौद्ध धम्म प्रसार कसा झाला त्या मधील जन आदेश काय आहेत किवा त्यांचे भोगोलिक स्थान कोणते आहेत चे विस्तृत पणे वर्णन या प्रकरणात केले जाणार आहे

7) **सम्राट अशोकाच्या गुहालेखातील बौद्ध धम्म प्रसार**

प्रस्तुत प्रकरणा मध्ये सम्राट अशोकाच्या सर्वच 40 शिलालेख आहेत त्या पैकी गुहालेखातील लिखानाद्वारे बौद्ध धम्म प्रसार कसा झाला त्या मधील जन आदेश काय आहेत किवा त्यांचे भोगोलिक स्थान कोणते आहेत चे विस्तृत पणे वर्णन या प्रकरणात केले जाणार आहे

8) निष्कर्ष /उपसंहार

सम्राट अशोकाच्या काळातील मागधी भाषा साहित्य यांचा शिलालेखामध्ये मोठ्या प्रमाणात वापर केलेला आहे प्रस्तुत शोधप्रबंध यामध्ये गृहीतकाचे आधारे अभ्यास केला असता वरील प्रकरना नुसार त्याचे विवेचन केले असता खालील प्रमाणे बौद्ध धर्माच्या प्रसारासाठी सम्राट अशोकाने आपल्या शिलालेखात द्वारे धम्म आज्ञा दिलेल्या आहेत त्यातून सम्राट अशोक पूर्व व सम्राट अशोक काळातील सामाजिक धार्मिक परस्थिती समजण्यात मोठ्या प्रमाणात मदत होते सम्राट अशोका द्वारे बौद्ध धर्म प्रसार यासाठी जे विविध प्रकारची प्राथमिक, दुय्यम साधनांचा आधार घेतला जाणार आहे त्या

आधारावर खालील प्रकारचे निष्कर्ष पूर्णत्वास येतात. सम्राट अशोकाचे शिलालेख हे सम्राट अशोकाच्या कारकिर्दीच्या इतिहासाची अतिशय महत्त्वाची अशी साधने आहेत. ज्या ज्या ठिकाणी हे आलेख सापडले त्यावरुन मौर्य साम्राज्याच्या सीमा निश्चित करणे शक्य होते. सम्राट अशोकाच्या कारकिर्दीत झालेल्या कलिंगच्या युद्धाची माहिती त्याच्याच कलिंग आलेखातून मिळते. सम्राट अशोकाच्या कारकिर्दीचा कालानुक्रम निश्चित करण्यासाठी या आलेखांची मदत होते . सम्राट अशोकाने बौद्ध धर्माचा स्वीकार केल्याचा पुरावा यामधून प्राप्त होतो व बौद्ध धर्माच्या प्रसारासाठी सम्राट अशोकाने केलेल्या कामगिरीचे वर्णन यातून सहज पणे स्पष्ट होते.बौद्ध धर्माची दीक्षा घेतली असली तरी, सम्राट अशोक कर्मठ वादी नव्हता तसेच आपल्या प्रजाजनांवर बौद्ध धर्मची त्यांनी तो सक्तीने लादण्याचा कधीच प्रयत्न केला नसल्याचेही या शीलालेखांतून स्पष्ट होते. परदेशात बौद्ध धर्म आणि भारतीय संस्कृतीचा प्रसार करण्यासाठी सम्राट अशोकाने बौद्ध भिक्षूंना पाठवल्याचा लेखी पुरावा या शिलालेखांतून संशोधकास प्राप्त होतो

1) सम्राट अशोकाच्या प्रमुख शिलालेखा द्वारे सम्राट अशोकाने केलेला साम्राज्य विस्तार कसा झाला व कोणत्या प्रदेशावर होता हे ज्ञात होते.

2) सम्राट अशोकाच्या शिलालेखातून पाली भाषा व साहित्याचे विवेचन होते तसेच सम्राट अशोकाच्या शिलालेखातून तत्कालीन समाजाचे सामाजिक व धर्म चित्रण स्पष्ट होते.

3) सम्राट अशोकाच्या शिलालेखातून सांस्कृतिक जीवन याचे सुद्धा दर्शन घडून येते.

4) सम्राट अशोकाच्या काळातील सर्वच शिलालेख हे बौद्ध धर्माच्या प्रसारासाठी नव्हते हेही स्पष्ट होते.

5) सम्राट अशोकाच्या काळातील तात्कालिन परिस्थिती व धर्मप्रसार शिलालेखा द्वारे प्रसार कसा झाला त्या काळातील कला, साहित्य तसेच स्त्रियांची बौद्ध धर्म प्रसारातील सहभाग या बरोबरच सर्वधर्म समभाव दृष्टीक्षेपात पडतो.

6) **युद्ध नको शांती हवी** ही शिकवण सम्राट अशोकाच्या शिलालेखातून प्राप्त होते.

7) सम्राट अशोकाच्या शिलालेखा द्वारे बौद्ध धर्माची व धम्माच्या विचारा ची भारतीय समाजाला अत्यंत गरज आहे हे त्यातून स्पष्ट होते.

8) सम्राट अशोकाने आपल्या शिलालेखात द्वारे जनतेने परस्पर प्रेम व आदर बाळगावा तसेच प्राणिहत्या करू नये असाही संदेश दिलेला आहे.

9) सम्राट अशोकाने आपल्या शिलालेख द्वारे वनसंवर्धन व वृक्षारोपण ही काळाची गरज यांचेही विवेचन केले असून सण समारंभातील खर्च संदर्भातही विवेचन केले आहे हे ज्ञात होते .

10) सम्राट अशोकाच्या शिलालेखात द्वारे एक नवी सामाजिक व धार्मिक दिशा समाजाला प्राप्त होते सम्राट अशोकाचे शिलालेख आतून बौद्धधर्म विचार प्रवाह विचार सरणी ज्ञात होते.

संदर्भ ग्रंथ सूची

1) कोसंबी धर्मानंद- (1926) बौद्ध संघाचा परिचय, मंगेश नारायण कुलकर्णी, कर्नाटक प्रेस, मुंबई

2) गुंडोपंत हरिभक्त- (1953) अशोक आणि त्यांचे लेख, प्रा गोम नवा ते नऊ मॅडम मुंबई 7

3) गोखले शोभना- (1972) पुराभिलेख विद्या,महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथनिर्मिती मंडळासाठी कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे 30

4) डॉ. डांगे सिंधू- (1980) बौद्ध धर्म आणि तत्वज्ञान, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथनिर्मिती मंडळ करिता कॉन्टिनेन्टल प्रकाशन विजय नगर पुणे 30

5) ओझा गौरीशंकर हिराचंद- (1918) प्राचीन लिपी, माना राजपुताना म्युझियम अजमेर

6) प्रोफेसर वाजपेयी कृष्णदत्त -ऐतिहासिक भारतीय अभिलेख .पब्लिकेशन स्कीम 57 मिश्र राजाजी का रास्ता जयपुर-1

7) पांडे राजबली - (2002) अशोक के अभिलेख. ज्ञानमंडल लिमिटेड वाराणसी

9) आपटे वासुदेव. गो. (2002) सम्राट अशोक चरित्र-वरद सेनापती बापटमार्ग 397/1 पुणे 16

10)प्रो थापर रोमली (2001) अशोक और मोर्य साम्राज्य का पतन-राजकमल प्रकाशन नयी दिल्ली 32

11) Singh, N.K. &-Buruah,B(2003) Enchclopedic Dictionary of Pali literature, Val - I, II. Global Vision Punlishing House, 19A/E, G.T.B. Enclave, Delhi- 93,

12) G.Srinlvasa murti &A.N.Krishna- (1950)Edicts of Asoka (Pritadars'in) the Adyar library, C. Subbarayudu, at the Vasanta press. The Theosophical society, Adyar, madras

13) Smith, V. A.(1897)-Ashoka rules of India, Royal Ashitatic Society, Culcatta,

संशोधक विद्ध्यर्ती
सरस्वती निवृत्ती सोनाळे

संशोधन मार्गदर्शक
प्रा.डॉ.आर.आर.पिंपळपल्ले